प्रशासकीय मान्यता

श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे या संस्थेकरिता जिल्हा वार्षिक योजनांतर्गत मंजूर अनुदानातून यंत्रसामुग्री खरेदी करणेबाबत

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक : बीएचडी-२०१८/२५२/प्र.क्र.८४/प्रशा-१

मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,

दिनांक : १८ एप्रिल, २०१८.

वाचा :
१) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.
३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८.
४) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/यंसाख/ शावैमधु/एकलस्त्रोत/सायटो.सिस्टीम/२०५३/२०१८, दिनांक : २६.०२.२०१८.
५) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/यंसाख/ शावैमधु/एकलस्त्रोत/सायटो.सिस्टीम/२४७७/२०१८, दिनांक : ०६.०३.२०१८.

शासन निर्णय :-

श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे या संस्थेस खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार अटोमेटेड लिक्विड बेस्ड सायटोलॉजी सिस्टीम ही यंत्रसामुग्री जिल्हा वार्षिक योजनांतर्गत मंजूर अनुदानातून रुपये ९२,६३,०००/- (अक्षरी रुपये ब्याण्णव लक्ष त्रेसष्ठ हजार फक्त) इतक्या किंमतीस विहीत निविदा प्रक्रिया राबवून प्रचलित कार्यपध्दतीनुसार खरेदी करण्यास या शासन निर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	यंत्राचे नांव	नग	प्रत्येकी किंमत (रुपये)	एकूण किंमत (रुपये)	प्रशासकीय मान्यतेची रक्कम
१	लिक्विड बेस्ड सायटोलॉजी सिस्टीम	०१	९२,६३,०००	९२,६३,०००	९२,६३,०००
	एकूण			**९२,६३,०००**	**९२,६३,०००**

अटी :-

१. सदर प्रशासकीय मान्यता जिल्हा वार्षिक योजनांतर्गत अनुदानातून प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मितीची आवश्यकता नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा करावी.

३. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

४. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया "औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो-फार्मास्युटीकल्स कॉपोरेशन लि. मार्फत करण्याबाबत" निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/ प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७ नुसार विहीत निविदा प्रक्रिया राबवून करावी.

५. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, ही बाब संचालक(वैद्यकीय शिक्षण) आणि संबंधित अधिष्ठाता यांनी प्रमाणित करावी.

७. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.

८. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

९. सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे राज्यस्तरीय खरेदी समितीने अनुपालन करावे. सदर तरतूदीचे अनुपालन केलेल्या यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. या प्रयोजनासाठी उपरोक्त तक्यात नमूद केल्यानुसार येणारा यंत्रनिहाय खर्च सदर संस्थेस जिल्हा वार्षिक योजनांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व तो खालील लेखाशिर्षाखाली

खर्ची टाकण्यात यावा-

श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
सर्वोपचार रुग्णालय, धुळे
मागणी क्रमांक- ओ-३९

४५१५	-	इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च
(००) ८००	-	इतर खर्च
(४३)	-	जिल्हा योजना धुळे
(४३) (०१)	-	इतर जिल्हा योजना
५२	-	यंत्रसामुग्री व साधनसामग्री
		(४५१५ ०६९२)

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मधील तरतूदींनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१८१५०७४८९३१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.04.18 15:17:11 +05'30'

(अ. मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार -२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि., मुंबई.
३. जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे.
४. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
५. अधिष्ठाता, श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, धुळे.
७. निवडनस्ती (प्रशा-१).